क्र. नपप्रसं/म.ना.से.अनुज्ञेय लाभ/२००४/प्र.क्र.७५९/५
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखनवाला रोड,
वरळी, मुंबई - ४०० ०३
दिनांक : ८ फेब्रुवारी २००५

प्रति.
मुख्याधिकारी
नगरपरिषद (सर्व )

विषय :- नगरपरिषद कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवांतर्गत अनुज्ञेय असलेल्या लाभाबाबत.

संदर्भ :- १) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र. इएसटी/११८४/प्र.क्र.२१/६, दि.१४.५.१९८४
२) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेशक्र. डब्ल्यूपी/२००१/प्र.क्र.४/२००१/४/५, दि.२२.१.२००४
३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६अन्वये मा.आयुक्त तथा संचालक यांना असलेले अधिकार.

०१. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केलेल्या दि.१४.५.१९८४ चे आदेशान्वये राज्यातील नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे लाभ लागू करण्यात आले आहेत. परंतु जे लाभ शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येतात ते सर्व लाभ नगरपरिषद कर्मचाऱ्यांनाही लागू होतात असा समज नगरपरिषदांचा होतो. त्यामुळे संभ्रम निर्माण होऊन नगरपरिषदेकडून वेळोवेळी विचारणा करण्यात येते.

०२. महाराष्ट्र शासन त्यांचे कर्मचा-यांना देत असलेले सर्व लाभ हे महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत येत नाहीत. हे पुढील उदाहरणावरुन स्पष्ट होऊ शकेल.

अ) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. नपाप्र/१०९९/९९/प्रक्र-१५९/९८/नवि-१६, दि.४/४/२००० चे पत्राने नगरपरिषद कर्मचा-यांना ५ व्या वेतन आयोग लाभ केंव्हापासून लागू करावयाचा याबाबत संबंधित नगरपरिषदांनी त्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन निर्णय घेण्याबाबत निदेश दिले होते.

ब ) केंद्र शासनाचे धर्तीवर महाराष्ट्र शासन राज्य कर्मचा-यांना लाभ देत असले तरी सर्व लाभ केंद्र शासनाचे कर्मचा-यांप्रमाणे नसतात. उदाहरणार्थ ५ वा वेतन आयोग केंद्र शासनाने लागू केला तरी राज्य शासनाने तो राज्याचे निधी उपलब्धतेनुसार लागू केला. तसेच केंद्र शासकिय कर्मचा-यांचे निवृत्तिचे वय ६० वर्षे निश्चित करणेत आले आहे. तथापि राज्य शासकिय कर्मचा-यांचे वय वर्ग-३ करीता ५८ वर्षे व वर्ग-४ करीता ६० वर्षे निश्चित करणेत आले आहे. म्हणजेच केंद्र शासन त्यांच्या कर्मचा-यांना जे लाभ देते ते लाभ राज्य शासन जसेच्या तसे लागू करीत नाही.

०३. केंद्र शासन व राज्य शासन कर्मचारी, निमशासकीय संस्थामधील कर्मचारी यांच्या सेवाविषयक धोरणामध्ये सर्वसाधारणपणे समानता दिसून येत असली तरी आर्थिक सेवाविषयक लाभ केंव्हापासून द्यावयाचे, कसे द्यावयाचे याबाबत संबंधित शासन, निमशासकीय संस्था यांनी त्यांची आर्थिक कुवत विचारात घेऊन घ्यावयाचे असतात.

०४. शासकीय कर्मचाऱ्यांना दोन प्रकारे सेवा विषयक लाभ दिला जातो. काही लाभ महाराष्ट्र नागरी सेवा नियमाद्वारे दिले जातात व इतर लाभ वेळोवेळी शासनाद्वारे घेण्यात आलेल्या निर्णयाद्वारे दिले जातात. शासनाकडून वेळोवेळी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी देण्यात येणारे इतर लाभांच्या संदर्भात काही धोरणात्मक निर्णय घेतले जातात ते सर्व निर्णय नगरपरिषद कर्मचाऱ्यांनाही लागू आहे किंवा नाही याबाबत मार्गदर्शन देण्याची गरज विचारात घेऊन खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

०५. संदर्भ १ येथे नमूद केलेल्या आदेशान्वये नगरपरिषद कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू केल्याचे कळविण्यात आले होते. सध्या खालील सेवा नियम राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेले आहेत.

अ. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम.

ब. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन ) नियम १९८१.

क. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे याच्या काळातील प्रदाने) नियम १९८१.

ड. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१.

इ. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त आणि अपील) नियम १९७९.

प. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२.

फ. महाराष्ट्र नागरी सेवा ( निवत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४.

ग. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९.

०६. वरील नियम नगरपरिषदांनी आपल्या कर्मचाऱ्यांना लागू करणे अपेक्षित आहे. वरीलपैकी नियम लागू झाले नसल्यास वरीलपैकी कोणते नियम लागू करावे याबाबत नगरपरिषदेने आपली आर्थिक स्थिती विचारात घेऊन निर्णय घेण्यास नगरपरिषदा सक्षम आहेत. हे निर्णय खालील बाबींचा विचार करुन लाभ देण्याचा नगरपरिषदा निर्णय घेऊ शकतात.

१) नगरपरिषद कर्मचाऱ्यांना लाभ मंजूर करतांना आस्थापना खर्च शासनाने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असू नये. (आस्थापना खर्चाची परिगणना स्थायी निदेश २६ नुसार करण्यात यावी).

२) सदरचा योजनेचा लाभ नियमित कर्मचाऱ्यांपुरतांच अनुज्ञेय राहील. (अनियमित व रोजंदारी कर्मचारी यांना अनुज्ञेय राहणार नाही).

३) शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या पेक्षा जास्त नाही या मर्यादेत नगरपरिषद आपल्या कर्मचाऱ्यांना असे लाभ देऊ शकेल.

०७. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमाद्वारे दिलेल्या लाभाव्यतिरिक्त महाराष्ट्र शासन त्यांचे कर्मचाऱ्यांना काही इतर लाभ देतात. उदा. स्थानिक पुरक भत्ता, घ्ररभाडे भत्ता, स्वग्राम प्रवास भत्ता, वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती, वाहतूक भत्ता इत्यादी. नगरपरिषदेने आपली आर्थिक स्थिती विचारात घेऊन आपल्या कर्मचाऱ्यांना त्यापैकी लाभ दयावयाचे असल्यास शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असल्यापेक्षा जास्त नाही या मर्यादेत कर्मचाऱ्यांना असे लाभ खालील अटींवर देऊ शकतील.

अ) नगरपरिषद आस्थापनेवर कार्यरत कर्मचारी हे प्रामुख्याने स्थानिक रहिवासी असतात. राज्य कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांच्या एका गावातून दुसऱ्या गांवात बदल्या होत नाहीत. नगरपरिषद कर्मचारी प्रामुख्याने स्थानिक रहिवासी असल्याने त्यांचे स्वत:चेच घरात निवासस्थान असते. गावाच्या सीमा मर्यादीत असल्याने मोठया शहराप्रमाणे घर, प्रवास इत्यादी समस्या त्यांना मोठयाप्रमाणात रहात नाहीत. घरभाडे, स्थानिक पूरक भत्ता इत्यादी लाभ शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच द्यावयाचा नगरपरिषदांनी निर्णय घेतल्यास नगरपरिषदांच्या कररुपाने संकलित होणाऱ्या निधीतील विकास कामासाठीचा निधी मोठया प्रमाणावर याकामी खर्च करावा लागेल याचा तारतम्याने विचार करुनच हा लाभ नगरपरिषद कर्मचाऱ्यांना देण्याबाबत स्थानिय पातळीवर नगरपरिषदांनी निर्णय घ्यावा.

ब) नगरपरिषद कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत आपोआप लागू नाही. परंतु नगरपरिषद कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा जिल्हयात / राज्यात रजा प्रवास सवलत देण्याबाबत नगरपरिषदानी विचार करावा.

क) नगरपरिषदांचे स्वत:चे दवाखाना / रुग्णालय यामध्ये किंवा शासकीय रुणालयात नगरपरिषद कर्मचाऱ्यांना मोफत नाममात्र शुल्क आकारुन वैद्यकीय लाभ उपलब्ध असतात. ही सवलत उपलब्ध असल्यामुळे नगरपरिषद कर्मचाऱ्यांना कोणत्या परिस्थितीत वैद्यकीय प्रतिपुर्ती दयावी याबाबत नगरपरिषदांनी निर्णय घ्यावे. त्याचप्रमाणे वैद्यकीय प्रतीपूर्ती ऐवजी ठोक वैद्यकीय भत्ता (रु. ५०/- ते १००/- च्या मर्यादेत) दयावा हा सुध्दा एक पर्याय आहे. या शिवाय कर्मचाऱ्यांपुरता वैद्यकीय विमा (Mediclaim) पॉलिसीचा सर्वसाधारणपणे कमीत कमी रकमेचा लाभ देण्याच्या पर्यायाचा नगरपरिषद खालील शर्तीस अधिन राहून विचार करु शकेल. नगरपरिषदेचा आर्थिक खर्च विहित मर्यादेत असल्यास कर्मचाऱ्यांना वैद्यकीय विमा योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यास हरकत नाही. तथापी प्रती कर्मचारी नगरपरिषदेचा खर्चाचा हिस्सा रु.७५ ते १००/- पेक्षा जास्त असू नये व उर्वरीत खर्चाचा हिस्सा कर्मचाऱ्याने स्वत: भरणे बंधनकारक असावे.

०८.	नगरपरिषद आस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या प्रतिनियुक्तीवरील शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचे सर्व सेवा विषयक लाभ अनुज्ञेय राहतील.

०९.	नगरपरिषदांनी वरील निर्णयाचें परिपूर्ण पालन करुन नगरपरिषद कर्मचाऱ्यांना लाभ देण्याचा निर्णय घ्यावा.

(सुनील सोनी )
आयुक्त तथा संचालक
नगपरिषद प्रशासन संचालनालय